पुढारी

# 'रवळनाथ'चा सहामाही नफा १ कोटी १३ लाख : चौगुले

गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत ३० सप्टेंबर २०२३ अखेर १ कोटी १३ लाखांचा नफा झाला आहे. तर ठेवीमध्ये ३५ कोटींची वाढ झाली असून, ३१ कोटी ३० लाखांच्या कर्जाचे वाटप झाले आहे. त्यामुळे एकूण व्यवसाय ७०७ कोटी झाला आहे. संस्थेच्या सर्वोत्तम कामगिरीचा वाढता आलेख कायम राहिला आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



एम. एल. चौगुले

संस्थाध्यक्ष चौगुले म्हणाले, ३० सप्टेंबरअखेर संस्थेची सभासद संख्या ११ हजार ५१३ इतकी आहे. संस्थेत ४१५ कोटींच्या ठेवी असून, २९२ कोटी ३३ लाखांची कर्जे वितरित करण्यात आली आहेत. संस्थेकडे खेळते भांडवल ४६६ कोटी ५८ लाखांचे आहे. तर गुंतवणूक १४५ कोटींची आहे. सध्या मोबाईल बँकिंग, सीबीएस, मायक्रो एटीएम याद्वारे डिजिटल सेवा दिली जाते. तसेच आरटीजीएस, एनईएफटी, लॉकर, वीज बिलभरणा यासह पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅच ही सेवा तसेच गंभीर आजारी व वयोवृद्ध ग्राहकांना घरपोच सेवा सुरू आहे.

संस्थेच्या आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, कुडाळ, सांगली कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी, कुडाळ, सांगली, पुणे या ठिकाणी संस्थेच्या शाखा आहेत. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव यांच्यासह सर्व अधिकारी, संचालक, सभासद यांचे सहकार्य मिळाले, असेही ते म्हणाले.

My Kolhapur Edition
Oct 5, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in